संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर, आटपाडी

डॉ. सौ. चैताली समेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. समेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)

उपलब्ध सुविधा

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफिद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफिद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे ● ● अंक : ११९ ● ● सोमवार दि. १८ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

## लोकसभा निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करा : डॉ. राजा दयानिधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम दि. १६ मार्च २०२४ रोजी जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार सांगली जिल्ह्यात तिसऱ्या टप्प्यात दि. ७ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर होताच संपूर्ण देशात १६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत आदर्श आचारसंहिता लागू राहील. आदर्श आचारसंहितेची जिल्ह्यात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यास जिल्हा प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य राहील. आचारसंहितेचे उल्लंघन झाल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी केले.



**सांगली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी व उपस्थित अधिकारी**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. बैठकीस सहायक जिल्हाधिकारी अमित रंजन, उप जिल्हा निवडणूक अधिकारी निता शिंदे, महानगरपालिका उपायुक्त स्मृती पाटील, जिल्हा माहिती अधिकारी फारूख बागवान, महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी धनंजय हर्षद आदी उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रियेची आणि आदर्श आचारसंहितेची सविस्तर माहिती राजकीय पक्ष तसेच अधिकाऱ्यांनी घ्यावी. आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही यादृष्टीने सर्वांनी दक्षता घेवून निवडणूक यंत्रणेला सहकार्य करावे. इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे व सोशल मीडियावरील राजकीय जाहिरातींचे जिल्हास्तरावर गठीत केलेल्या माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समिती कडून प्रमाणिकरण करून घेणे बंधनकारक आहे. उलंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था, पक्ष व त्रयस्त यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

सांगली जिल्ह्यासाठी मुक्त व पारदर्शी निवडणुका पार पाडण्याकरीता आवश्यक असणारे मनुष्यबळ व पुरेसा बंदोबस्त मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. सांगली जिल्हा प्रशासन लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी सज्ज असून निवडणुकीबाबत विविध विषयासाठी जिल्ह्यामध्ये एकूण २० नोडल ऑफिसरची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांनी त्यांचे कामकाज सुरू केलेले आहे. जिल्ह्यात निवडणूक आदर्श आचारसंहितेचे सर्वांनीच काटेकोरपणे पालन करून निवडणूक मुक्त, निर्भय व शांततामय वातावरणात पार पाडण्याची आहे. आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत मतदारांना १९५० हा टोल फ्री क्रमांकावर तसेच सीव्हिजील पवरून आचारसंहिता भंगाची तक्रार दाखल करता येणार आहे. त्यावर १०० मिनीटांच्या आत तक्रारीचे निराकरण होईल. या निवडणुकीसाठी नागरिकांनी जिल्हा प्रशासनास सहकार्य करावे. तसेच आदर्श आचारसंहितेचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी यावेळी केले.

## अकलूजच्या 'शिवरत्नवर' राजकीय उलथापालथ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

माळशिरस/प्रतिनिधी : माढा लोकसभा मतदारसंघामध्ये भाजपकडून पुन्हा विद्यमान खासदार रणजीतसिंह मोहिते पाटील यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. परंतु भाजपकडून प्रबळ दावेदारी असलेल्या अकलूजच्या धैर्यशील मोहिते पाटील हे कोणत्याही परिस्थिती निवडणूक लढविणार असल्याने अकलूज येथील 'शिवरत्नवर' राजकीय उलथापालथ झाली आहे.

रणजितसिंह निंबाळकरांच्या विरोधात धैर्यशील मोहिते पाटील निवडणूक लढवण्याची शक्यता असल्याने याच पार्श्वभूमीवर अकलूजमध्ये माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, माजी मंत्री आणि विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर यांच्यासह शेकापचे जयंत पाटील यांच्यातील महत्वाची बैठक संपन्न झाली. या बैठकीला संजीवराजे नाईक निंबाळकर, रघुनाथराजे नाईक निंबाळकर, फलटणचे आमदार दीपक चव्हाण, सातारा जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई, सांगोल्याचे शेकापचे डॉ. बाबासाहेब देशमुख, अनिकेत देशमुख यांच्यासह शरद पवार यांचे निकटवर्तीय आणि संभाजी ब्रिगेड चे अध्यक्ष प्रवीण गायकवाड होते.

सोलापूर जिल्ह्यातील अकलूज येथील मोहिते-पाटील यांचे राजकारणात मोठे स्थान आहे. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली या घराण्यानं राजकारणात विविध पदांवर काम केले आहे. त्यामुळे धैर्यशील मोहिते पाटील यांनी माढा लोकसभेची उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात होती. परंतु रणजितसिंह निंबाळकरांना भाजपने उमेदवारी दिल्यानं मोहिते पाटलांची कोंडी झालीय. त्यामुळं मोहिते पाटील बंडखोरी करत पवारांच्या पाठिंब्यानं हाती तुतारी घेणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

माढा लोकसभा मतदारसंघातून रणजितसिंह निंबाळकरांच्या उमेदवारीला माजी मंत्री रामराजे नाईक निंबाळकर यांनी देखील विरोध केला होता. तर मोहिते पाटील आणि खास. निंबाळकर यांच्यातही खटके उडले होते. त्यामुळे निंबाळकरांच्या विरोधात हे नेते आहेत. तरीदेखील निंबाळकरांना भाजपनं पुन्हा उमेदवारी दिली असल्याने या ठिकाणी मोहिते-पाटील बंडखोरी करण्याच्या तयारीत आहेत.

## आटपाडीत स्विफ्ट गाडीच्या धडकेत एकजण गंभीर जखमी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी येथील कारखाना फाटी येथे दुचाकी व स्विफ्ट गाडीचा अपघात झाला असून यामध्ये दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. सदरचा अपघात हा दिनांक १५ रोजी सायंकाळी ७.३० च्या दरम्यान घडला. याप्रकरणी आटपाडी पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, यातील फिर्यादी संतोष हेगडे (वय ४९) रा. बनपुरी यांचा मुलगा रोहित हेगडे (वय २१) हा आटपाडी-दिघंची रोडवर कारखाना फाटी येथे दिघंची कडून आटपाडी कडे मोटारसायकल (एमएच-१०-बीडी-४५१३) वरून आटपाडीकडे येत असताना आटपाडी कडून दिघंचीकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या स्विफ्ट (एमएच-०२-डीझेड-००१९) गाडीने रोहित हेगडे चालवत असलेल्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

यामध्ये रोहित हेगडे याच्या डोक्याला मार लागला असून यामध्ये तो गंभीर जखमी झाला आहे. या अपघातामध्ये दोन्ही गाड्यांचे मोठे नुकसान झाले असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## गोमेवाडीतील एकाचा मोटारसायकल वरून पडल्याने मृत्यू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : दारू पिवून मोटारसायकल चालविणे गोमेवाडी येथील एकाच्या अंगलट आले असून यामध्ये त्याचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १६ रोजी घडली. याप्रकरणी आटपाडी पोलिसात अशोक गणपती घाडगे (वय ५५) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिका माहिती अशी, फिर्यादीचा पुतण्या अक्षय संजय घाडगे (वय २६) रा. गोमेवाडी, ता. आटपाडी हा चांगभले वस्ती करगणी येथे दारू पिऊन मोटरसायकल चालवून मोटरसायकल वरून स्वतः पडला होता. यामध्ये त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. यामध्ये त्याचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी आटपाडी पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

## मराठा आरक्षणासाठी तरुणाने जीवन संपवले

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

हिंगोली : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी तरुणाने विहिरीत उडी घेऊन जीवन संपवले. ही घटना आज (दि.१७) सकाळी नांदेड-हिंगोली महामार्गावरील वारंगा फाटा शिवारामध्ये घडली. चंद्रकांत अजबराव पतंगे (वय २५, रा. कांडली, ता. कळमनुरी) असे मृत तरुणाचे नाव आहे.



**मयत चंद्रकांत पतंगे**

याबाबत अधिक माहिती अशी की, कांडली येथील चंद्रकांत हा तरुण आज सकाळी पाच वाजता आईला मॉर्निंग वॉकला जातो म्हणून घराबाहेर पडला होता. दरम्यान, नांदेड- हिंगोली महामार्गावर वारंगा फाटा शिवारामध्ये एका विहिरीमध्ये तरुणाचा मृतदेह आढळून आला. याची माहिती नागरिकांनी पोलिसांना कळवली.

पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह विहिरीच्या बाहेर सकाळी साडेअकरा वाजता काढण्यात आला.

डोंगरकडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. विनोद अतकुरकर यांनी मृतदेहाचे शवविच्छेदन केले. तरुणाच्या खिशात मराठा आरक्षणासाठी जीवन संपवत असल्याची चिठ्ठी सापडल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## दिघंचीत हार्डवेअर दुकानात चोरी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यातील दिघंची येथील हार्डवेअर दुकानात चोरी झाली आहे. चोरीमध्ये अज्ञात चोरट्यांनी दुकानातील विविध सामानाची चोरी केली असून अंदाजे ७० हजार रुपयांच्या वस्तू लंपास केल्या आहेत. याप्रकरणी दुकान मालक सुभाष रामचंद्र जरे यांनी आटपाडी पोलिसात अज्ञात चोरट्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, सुभाष रामचंद्र जरे यांचे संजय ग्रो सेल्स या नावाने दिघंची येथे हार्डवेअरचे दुकान आहे. या दुकानात दिनांक १४ रोजी च्या पहाटे अज्ञात चोरट्यांनी दुकानात भिंतीवरील पत्रा उचकटून आत प्रवेश केला. यामध्ये चोरट्यांनी, ९५०० रुपये किमतीची कॉपर, ९५०० रुपये किमतीचे जुने कॉपर, २५००० रुपयांच्या घरगुती मोटरी, ८००० रुपये किमतीचे जुन्या स्प्रे पंपाचे जुने गन मेटल पार्ट, १५०० रुपयांचा ग्राइंडर, ५५०० रुपये किमतीचा वजन काटा अशी एकूण ६९५०० रुपये किमतीचा मुद्देमाल लंपास केला. चोरीबाबत आटपाडी पोलिसात सदर घटने बाबत गुन्हा नोंद झाला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## 'शक्तीपीठ' महामार्गाबाबत शेतकऱ्यांनी हरकती नोंदवाव्या

### भाई दिगंबर कांबळे : कोळा येथे महामार्ग बाधित शेतकऱ्यांची बैठक संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

कोळा : सांगोला तालुक्यातील कोळा येथे कोळा जिल्हा परिषद गटातील कोळा, डोंगर पाचेगाव, सोमेवाडी, बुद्धेहोळ, चोपडी यासह अन्य भागातून नागपुर-गोवा शक्तिपीठ महामार्ग जाणार आहे. शेतकऱ्याचे नुकसान होऊ नये, शेतकऱ्यांना मोबदला मिळाला पाहिजे बाधित क्षेत्र एकाच हायवे प्रकल्पासाठी साठी घेणार असाल तर संपूर्ण बाधीत गावातील बाधित क्षेत्राला कमीत कमी एकरी दोन कोटी रुपये एकसमान मोबदला शासनाने द्यायलाच पाहिजे यासह विविध मागण्यासंदर्भात

> सांगोला तालुक्यातील सर्व बाधीत शेतकऱ्यांच्या नागपुर गोवा शक्तीपीठ महामार्ग बाधीत शेतकऱ्यांच्या हरकती मंगळवार दि. १९ मार्च रोजी सकाळी ११ वा. मंगळवेढा प्रांताधिकारी यांना देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.
>
> **भाई दिगंबर कांबळे**

१९ मार्च रोजी मंगळवेढा प्रांत कार्यालय येथे नागपुर गोवा शक्तिपीठ महामार्गाच्या हरकती नोंदवण्यासाठी शेवटचा दिवस आहे. त्यामुळे जास्तीत जास्त बाधीत शेतकऱ्यांनी आपल्या हरकती नोंदवल्या पाहिजेत तरच शेतकऱ्यांना फायदा मिळणार आहे असे मत नागपुर गोवा





**कोळा : येथे आयाजित शेतकरी बैठकीत मार्गदर्शन करताना भाई दिगंबर कांबळे तर बैठकीला उपस्थित कोळा परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

शक्तिपीठ महामार्ग बाधित शेतकरी संघर्ष समिती राज्य समन्वयक शेकापचे नेते भाई दिगंबर कांबळे यांनी व्यक्त केले.

यावेळी बोलताना भाई दिगंबर कांबळे म्हणाले, राज्य सरकार जरी सार्वजनिक हितार्थ म्हणून शक्तिपीठ महामार्ग प्रकल्प शेतकऱ्यांच्या माथी मारत आहेत. या महामार्गाची कुणाचीही मागणी नाही व जमीन देण्याची अजिबात इच्छा नाही. त्यामुळे शक्तीपीठ महामार्ग प्रकल्पाला आमचा संपूर्ण विरोध आहे.

तसेच पुढे बोलताना ते म्हणाले, नागपुर गोवा शक्तीपीठ हायवे बाधित प्रत्येक गावातील संपूर्ण बाधित शेतकर्यां ना त्यांच्या मागणी प्रमाणे त्यांचा संपूर्ण मोबदला बँक खात्यात जमा होत नाही तोपर्यंत महामार्गाचे कसलेही काम सुरू करू नये. हायवे मध्ये जे शेतकरी भूमिहीन होणार आहेत त्यांना भूमिहीन व संपुर्ण बाधित शेतकर्यींना प्रकल्पग्रस्त दाखला देण्यात यावा असे ते म्हणाले.

## लोकसभेच्या पार्श्वभूमीवर पोलीस पाटलांनी सतर्क रहावे : बिराजदार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड/प्रतिनिधी : पोलीस पाटील हा गाव पातळीवरील प्रशासनाचा मुख्य घटक असल्याने आगामी लोकसभा निवडणुक शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस पाटील यांनी गावात सतर्क राहावे असे आवाहन सपोनि सखाराम बिराजदार यांनी केले.

म्हसवड ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सखाराम बिराजदार यांनी पोलीस ठाण्याचा चार्ज स्वीकारल्या नंतर तातडीने पोलीस पाटील यांची म्हसवड पोलीस ठाण्यामध्ये बैठक आयोजित केली होती. यावेळी पोलीस उपनिरीक्षक अनिल वाघमोडे, अभिजीत भादुले उपस्थित होते.



**म्हसवड : येथील पोलीस ठाणे येथे आयोजित पोलीस पाटील यांना मार्गदर्शन करताना सपोनि सखाराम बिराजदार**

पुढे बोलताना सपोनि बिराजदार म्हणाले, पोलीस पाटील हा गावातील प्रशासनाचा महत्त्वाचा घटक आहे. महसूल प्रशासन व पोलीस प्रशासन आणि गाव यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम करत असतो. सध्या देशात लोकसभा निवडणुका होत आहेत. लोकसभा निवडणुकी संदर्भ मध्ये गावात आतापासूनच निवडणुकीचे वातावरण तयार होत आहे. लोकसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागल्यापासून ते निवडणुका संपेपर्यंत पोलीस पाटील यांनी गावात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दक्ष राहून काम करण्याची गरज आहे.

म्हसवड पोलीस स्टेशन अंतर्गत असलेल्या सर्व गावातील पोलीस पाटील हे अतिशय सक्षम पोलीस पाटील म्हणून कार्यरत आहेत. तरीही निवडणुकीच्या काळात त्यांनी अधिक सक्षमपणे गावातील हालचालींवर व अवैद्य व्यावसायिकांवर लक्ष ठेवण्याची गरज आहे. गावात जर तशी कायदा सुव्यवस्थे संदर्भात काही परिस्थिती उदभवणार असेल तर लगेचच स्वतः मला किंवा पोलीस स्टेशनशी संपर्क साधून पोलीस पाटलांनी माहिती द्यावी व गावात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन सपोनि सखाराम बिराजदार यांनी या वेळी केले.

या बैठकीस म्हसवड विभागातील सर्व पोलीस पाटील उपस्थित होते. यावेळी पोलीस पाटील संघटनेच्या वतीने तालुकाध्यक्ष शहाजी बनगर पाटील यांनी सपोनि सखाराम बिराजदार यांचा सत्कार करण्यात आला.

## कौठुळीच्या ग्रामस्थांकडून तानाजीराव पाटील यांचा सत्कार



**आटपाडी : तानाजीराव पाटील यांचा सत्कार करताना कौठूळी येथील नागरिक यावेळी उपस्थित दत्ता (पंच) पाटील, मनोज नांगरे व उपस्थित मान्यवर**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आवळाई शेरेवाडी मार्गे (कौठुळी) जरेमळा येथील डांबरीकरण रस्त्यासाठी भरघोस निधी ऊपलब्ध करून दिल्याबद्दल सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक तानाजीराव पाटील यांचा कौठुळी गावच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी कौठुळी गावचे भारतशेठ कदम, बाबुराव चव्हाण, शिवाजी कदम, सिद्धनाथ जरे, बापुसाहेब लोहार, विश्वजित कदम, दिनेश कदम, सतिश कदम, हरी जरे, गोरख जरे, अमोल जरे, राजे चव्हाण, विष्णु चव्हाण, बाळु चव्हाण, दत्ता (पंच) पाटील, मनोज नांगरे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## * संपादकीय *


# लॉटरीभरोसे लोकशाही!

भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि तिचे सारे अर्थकारण स्वच्छ व पारदर्शक व्हावे, असे कुणालाही मनापासून वाटत नाही. तसे प्रयत्नही होत नाहीत. केंद्र सरकारने 'निवडणूक रोखे' नावाची जी अपारदर्शक, अनेक गैरप्रकार पोटात घालू शकणारी आणि देशातील भांडवलदारांचे हात बळकट करणारी जी यंत्रणा आणली होती; ती सर्वोच्च न्यायालयाने 'घटनाबाह्य' म्हणून रद्द केली होती. हा निर्णय देऊन एक महिना झाला तरी या रोख्यांचे व्यवस्थापन पाहणाऱ्या 'स्टेट बँक ऑफ इंडिया'ने सर्वोच्च न्यायालयाला हा सारा तपशील दिला नव्हता. शेवटी न्यायालयाला कडक शब्दांत इशारा द्यावा लागला. तेव्हा कुठे आता हा तपशील सर्वोच्च न्यायालयासमोर आला आहे. यात बड्या कंपन्या जशा आहेत; तशा फारशी चमकदार कामगिरी न करणाऱ्या कंपन्याही आहेत. आपला मूळ निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने या देणग्यांची आणि रोख्यांची गुप्तता राखणे म्हणजे भारतीय नागरिकांना मिळालेल्या माहितीच्या अधिकाराचा भंग आहे, असा ठपका ठेवला होता; तो योग्यच होता. स्टेट बँकेने रकमांचा आणि देणगीदारांचा तपशील देण्यामध्ये जी टाळाटाळ चालविली होती, तिच्यातून या माहितीच्या अधिकाराविषयी नसणारी बांधिलकीही दिसत होती. आता ही योजना रद्द झाली असली तरी मुळात ती आणणे योग्य होते का, हा प्रश्न पडतो. विविध कंपन्यांची जी नावे आणि त्यांनी दिलेल्या रकमा पाहिल्या तर या प्रश्नाचे गांभीर्य कितीतरी वाढते.

यातील एक उदाहरण पाहण्यासारखे आहे. सर्व माध्यमांमध्ये प्रकाशित झालेल्या तपशिलानुसार 'फ्युचर गेमिंग अँड हॉटेल सर्विसेस' या कंपनीने एक हजार ३६८ कोटी रुपयांचे निवडणूक रोखे विकत घेतले होते. पण ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात या कंपनीला मिळालेले उत्पन्न केवळ पाचशे कोटी रुपये होते. या कंपनीची वार्षिक उलाढाल वीस हजार कोटींची असली तरी वर्षभरातील उत्पन्नाच्या दुपटीहून कितीतरी अधिक रकमेचे रोखे ही कंपनी कशी काय विकत घेऊ शकली? ही कंपनी देणगीदारांमध्ये पहिल्या क्रमांकावर असल्याने तिच्याविषयी सगळ्यांची उत्सुकता वाढली. तेव्हा 'लॉटरी किंग' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सँतिआगो मार्टिन यांची ही कंपनी असल्याचे उघड झाले. देशातल्या लॉटरी धंद्याचे हे कर्तेकरविते. आजवर त्यांनी बऱ्याच सरकारी यंत्रणांशी लपंडाव खेळला आहे. एकदा सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) यांच्याकडून शंभर कोटींची रोकड जप्त केली; तर एकदा १९ कोटींच्या मालमत्तेवर टांच आणली. ऑनलाइन लॉटरीचे मोठे केंद्र बनलेल्या सिक्कीम राज्याला एका वर्षातच नऊशे कोटी रुपयांचा गंडा घालण्यात आला होता. सर्वाधिक निवडणूक रोखे विकत घेणाऱ्या कंपनीचे हे आर्थिक चरित्र आणि चारित्र्य! अशा लोकांकडून सत्ताधारी आणि इतरही सर्व राजकीय पक्ष देणग्या घेणार आणि नागरिकांना मात्र दिवसरात्र नैतिकतेचे डोस पाजणार. त्यांना प्रत्येक पावलावर जीएसटीचा जाच लावणार. फ्युचर गेमिंगप्रमाणे देणगी देणाऱ्या प्रत्येक कंपनीचे आर्थिक चारित्र्य खरे तर सार्वजनिक चव्हाट्यावर तपासले गेले पाहिजे. एकीकडे स्वच्छ कारभाराच्या गप्पा मारायच्या आणि दुसरीकडे देशातील प्रचंड पैसा राजरोस सर्वच राजकीय पक्षांच्या तिजोऱ्यांमध्ये पडण्याची व्यवस्था करायची, असा हा प्रकार होता. सर्वोच्च न्यायालयाने याला चाप लावून मोठे काम केले. ते मध्येच सोडून न देता त्याचा तार्किक शेवट करायला हवा. गरज पडली तर न्यायालयाने प्रत्येक देणगीदार कंपनीची ताळेबंदाची कसून चौकशी करावी.

भारतीय जनता पक्ष सत्तेत असल्याने त्याला सर्वाधिक देणग्या मिळणार, हे उघडच होते. वरवर पाहता स्टेट बँकेकडून बाँड म्हणजे रोखे घेणे, हा सरळ व पारदर्शक व्यवहार वाटला तरी या साऱ्या व्यवहारात काळा पैसा येणारच नाही आणि एकदा विकत घेतलेले रोखे एकाकडून दुसऱ्याकडे काळ्या पैशाच्या देवघेवीतून जाणारच नाहीत, याची काहीही शाश्वती नव्हती. किंबहुना, अधिकृतपणे रोखे विकत घेणाऱ्यालाच काळा पैसा देऊन व्यवहार होण्याची दाट शक्यता होती. यातील गुप्ततेचा भागही संशयास्पद होता. रोखे विकत घेणारा कोणता उद्योगपती त्या पक्षांना जाऊन आपले दातृत्व सांगणार नाही? दुसरीकडे, स्टेट बँकेकडे असणारा तपशील सत्ताधाऱ्यांना समजल्याशिवाय राहील काय? मोदी सरकारला आपण करू तीच पूर्व दिशा आणि आपण करतो ते सारे योग्यच, असा गंड झाला आहे. त्यामुळेच, या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने एकापाठोपाठ एक दिलेले तडाखे स्वागतार्ह आहेत. एका बाजूला देशातील काळा पैसा संपविण्याची भाषा करायची आणि दुसरीकडे, काळ्या पैशाचा धुडगूस होऊ शकेल आणि दुर्व्यवहारी कंपन्यांना आसरा देता येईल; अशा रोखे योजना आणायच्या, त्यासाठी कायद्यांमध्ये बदल करायचे, हा दुटप्पीपणा होता. भारतातील निवडणुका स्वच्छ करणे, हे किती मोठे व जटिल आव्हान आहे; हे या साऱ्या प्रकरणातून पुन्हा दिसले. पुढच्या सरकारने त्याकडे जरा गंभीरपणे पाहावे.

# संविधान हाच मानवमुक्तीचा मार्ग




राज्यघटना दुरुस्तीसाठी बहुमत द्या' या अनंत कुमार हेगडे यांच्या वक्त्यावरून वाद, काँग्रेसची भाजपवर टीकाया शीर्षकाची बातमी (११ मार्च २०२४) वाचली. या बातमीतील वक्तव्याची फार चीड आली. खरे तर आज महाराष्ट्रातलेच नव्हे तर देशातले वातावरण प्रचंड गढूळ झाले आहे. जिकडे तिकडे धार्मिक आणि जातीय उन्माद फार बोकाळला आहे. ज्यांना आम्ही निवडून दिले आहे ते लोकप्रतिनिधी आणि राजकीय पक्षांचे कार्यकर्ते काहीही वाट्टेल तसे बरळताना दिसत आहेत. भारतीय संविधानाची त्यांनी शपथ घेतली आहे. मात्र त्याची त्यांना कुठल्याही प्रकारची जाण आणि भान दिसत नाही. केवळ फक्त संविधान बदलणे, हिंदुत्व, भोंगा आणि हनुमान चालीसा वाचा, कधीही देवळात जात नाहीत, देवाच्या पाया पडत नाहीत, आशा मुद्द्यावर राजकारण केले जात आहे. काहीजण तर मी किती प्रतिगामी आहे आणि ते किती खोटे पुरोगामी आहेत हे सांगण्याचा प्रयत्न करत आहेत नव्हे तर जणू काही त्यांची शर्यतच लागली आहे असे दिसते. त्यामुळे देशातले वातावरण प्रचंड दूषित झाले आहे. माणूस माणसाकडे द्वेषयुक्त नजरेने पाहत आहे. यामध्ये मात्र हातावर पोट असलेली, गरीब, सामान्य जनता होरपळताना दिसत आहे. त्यांना खायला अन्न नाही. कामधंदे नाहीत. बेकारी वाढली आहे. सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या नाहीत. तरुणांच्या हाताला काम नाही. महागाई प्रचंड वाढली. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. आरोग्याच्या सुविधा फार कमी आहेत. शाळा महाविद्यालयाची दैन्यावस्था, गोरगरिबांना शिक्षण नाही. खासगीकरण होत आहे. अन्याय अत्याचार वाढले आहेत. कंत्राटी पद्धत आली आहे. असे अनंत प्रश्न तोंड वर काढत आहेत. त्यांचा विचार मात्र कुठल्याही लोकप्रतिनिधींना, राजकारण्यांना किंवा सरकारला नाही. ज्यांच्या जीवावर हे लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत, ते सत्तेच्या जोरावर सत्तेसाठी मस्ती करताना दिसत आहेत. स्वार्थ आणि मतलबासाठी जनतेच्या प्रश्नांना बगल देताना दिसतात. संविधानाची पायमल्ली करत उलट तेच सविधानांवर बोलताना दिसत आहेत. दिल्लीसारख्या ठिकाणी तर संविधान जाळले जाते आहे. ज्यांच्यामुळे आमचे कल्याण होणार आहे त्या संविधानाचे महत्व अजूनही सामान्य जनतेला माहित नाही. ते संविधानाबाबत आपल्या हक्क, कर्तव्याबाबत जागरूकही नाहीत. त्यामुळेच देशातील जातीय, धर्मवादी यांचे फावते आहे. जो तो धर्माचा वापर राजकारणासाठी करताना दिसतो आहे. सामान्य जनतेला मात्र यामध्ये विनाकारण गोवले जात आहे. त्यांना अत्यंत पद्धतशीरपणे यामध्ये वापरून घेतले जात आहे. त्याला अनेक जण बळी पडत आहेत. त्यामुळे तेही स्वतःच्या पायावर स्वतःचा धोंडा मारून घेत आहेत. अनेक जण तर संविधान साक्षरतेपासून कोसो दूर असल्याने त्यांना मात्र मानवतेची, मूल्याची जाणच झालेली दिसत नाही. त्यामुळेच प्रत्येकाने भारतीय संविधान वाचणे आणि त्याची जपणूक करणे आज काळाची गरज निर्माण झाली आहे.

२६ जानेवारी १९५० पासून आपल्या देशाने प्रजासत्ताक म्हणजे लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. भारतीय संविधानाने एकंदरीत सर्व नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान केले आहेत. भारतीय संविधान म्हणजे जगातील समग्र मानव कल्याणकारी मूल्यांचा अर्क आहे. आजही आम्ही संविधानाकडे केवळ फक्त कायद्याचाच ग्रंथ आहे अशा मर्यादित अर्थाने पाहतो. डॉ. अनंत राऊत म्हणतात की, 'संविधान हा आपला उदात्त असा सामाजिक व सांस्कृतिक दस्तावेज आहे.'

मानवी कल्याण साधायचे असेल तर प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये संविधानिक नैतिक मूल्यांची जोपासना करणे ही काळाची गरज आहे. मानवी जीवनामध्ये काही प्रजासत्ताक नैतिक मूल्यांची जोपासना करून जीवन जगले पाहिजे आणि इतरांनाही जगू दिले पाहिजे. मूल्ये दोन प्रकारचे असतात एक चिरंतन व दुसरे तात्कालिक मूल्य. तात्कालिक मूल्यामध्ये ईश्वरनिष्ठा, स्वामीनिष्ठा, आरत्या, धर्म, अंधश्रद्धा, जातीयता अशा प्रकारची मूल्ये येतात. आपण भारतीय संविधानाचा स्वीकार केलेला आहे. त्यामुळे आपल्याकडे लोकशाही मूल्ये अस्तित्वात आहेत. लोकशाही मूल्यामध्ये राष्ट्रनिष्ठा, बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकनिष्ठा, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्ये येतात. लोकशाहीतील मूल्ये ही चिरंतन मूल्ये आहेत. पण जे तात्कालिक मूल्ये असतात, ती टिकणारी नाहीत, ज्यामुळे मानवी कल्याण साधता येणार नाही अशा मूल्यांची पेरणी करण्याचा आणि आचरणात आणण्याचा प्रयत्न आजचा माणूस करताना दिसतो आहे. भरतीय संविधान एक संस्कार ग्रंथ आहे. त्यातील मूल्याची जपणूक प्रत्येकाने केली पाहिजे. त्याप्रमाणे वागले पाहिजे. त्याप्रमाणे शासन व्यवस्था चालली पाहिजे तरच खऱ्या अर्थाने समाजामध्ये आमूलाग्र बदल झाल्याशिवाय राहणार नाही. दुर्दैवाने आजचे आमचे लोकप्रतिनिधी व शासन चालवणारे अधिकारी संविधानाची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने करताना दिसत नाहीत. उलट संविधानाची मोडतोड करून व्यवस्था बिघडविण्याचे म्हणजेच लोकशाही विरोधी काम करून लोकशाही संपविण्याचे काम ते जोरकसपणे करताना दिसत आहेत.

भारतातील प्रजासत्ताक मूल्यांमध्ये स्वातंत्र्य हे मूल्य फार महत्त्वाचे आहे. हे मूल्य समाज जीवनातील आणि मानवी जीवनातील अत्यंत मूलभूत आणि चिरंतन असे मानवी मूल्य आहे. पण काहीजण या मूल्याचा अधिकाधिक वापर करून बलशाली होण्याचा आणि इतरांना दुबळे करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. 'प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा संपूर्ण विकास करून घेण्याची समान संधी म्हणजे स्वातंत्र्य होय'. असे असतानाही सामाजिक स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक स्वातंत्र्य यामध्ये काहींचे वर्चस्व आहे. गरीब आणखी गरीब होत चालले आहेत. श्रीमंत आणखी श्रीमंत होत चालले आहेत. त्यामुळे स्वातंत्र्याचा अर्थ मर्यादितच राहिला आहे तो सर्वसामान्यांपर्यंत पोहोचला नाही, पोहोचविला नाही आणि पोहोचूही दिला जात नाही. त्यामुळे शासनस्तरावरून त्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

आपल्या देशात वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था आणि अस्पृश्यतेच्या माध्यमातून असंख्य लोकांचे आजही सामाजिक स्वातंत्र्य हिरावून घेतलेले दिसते. त्यामुळे भारत देशाचे खूप पुढे नुकसान झाले आहे. आजही या गोष्टी समाजव्यवस्थेमध्ये दिसून येतात. त्या हद्दपार करणे काळाची गरज आहे. माणसांनी निर्माण केलेल्या देवावर, धर्मग्रंथावर सर्वच माणसांचा नैसर्गिक अधिकार असायला हवा. परंतु आपल्या देशामध्ये स्त्रियांना व शूद्रांना धर्मस्वातंत्र्य नाकारले होते. ज्ञान घेणे प्रत्येक माणसाचा नैसर्गिक हक्क जरी असला तरी स्त्रियांना -शूद्रांना वेद वाचण्याचे, ऐकण्याचे, बोलण्याचे स्वातंत्र्य नाकारले होते. धार्मिक स्वातंत्र्यावर बंधने लादल्यामुळे देशांत असंख्य माणसांना स्वतःचा विकास करून घेता आला नाही परंतु भारतीय संविधानाने प्रत्येक व्यक्तीला ज्ञान मिळवण्याचे, धर्माची उपासना करण्याचे, धर्माचे ज्ञान मिळवण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

भारतीय संविधान, त्यातील नैतिक मूल्य प्रत्येकाने समजून घ्यायलाच हवीत. त्यांची अंमलबजावणी करायला हवी तरच देश प्रगतीपथावर जाईल. म्हणून प्रत्येकाने संविधानाचे वाचन करणे आणि संविधानाचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे; अन्यथा येणाऱ्या काळात जीवघेण्या संकटांना अनेक दुःखांना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे संविधानावर होत असलेले हल्ले प्रत्येक जाती धर्मातील सर्वांनी ते हल्ले परतवून लावले पाहिजेत. संविधान हे सर्व माणसांच्या कल्याणाचा मार्ग आहे हे लक्षात ठेवा.

# कर्नाटकमध्ये हुक्क्यावर बंदी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कर्नाटक सरकारने राज्यात हुक्क्यावर तात्काळ बंदी घातली आहे. कर्नाटकच्या आरोग्य विभागाने ७ फेब्रुवारीला एक अधिसूचना जारी करून ही माहिती दिली. त्यानुसार राज्यात हुक्क्याच्या विक्री आणि सेवनावर बंदी घालण्यात आली आहे. राज्य सरकारने 'सार्वजनिक आरोग्या'चे रक्षण करण्यासाठी अग्निशमन नियंत्रण आणि अग्निसुरक्षा कायद्यांचे उल्लंघन करत असलेल्या हुक्का बारमधील हुक्का विक्रीवर बंदी घातली आहे. गेल्या वर्षी कोरमंगला येथील हुक्का बारला लागलेल्या आगीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर ही बंदी घालण्यात आली आहे. बारमध्ये फायर आणि सेफ्टी नियम पाळले गेले नसल्याचा ठपका ठेवला होता. सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने कायदा २००३ आणि विविध राज्य अन् केंद्रातील कायद्यांतर्गत नियमांचं उल्लंघन



करणाऱ्यांवर गुन्हे दाखल केले जातील, असेही त्या अधिसूचनेत नमूद केले आहे.

त्यानंतर २० फेब्रुवारीला कर्नाटक सरकारने एक विधेयक सादर केले, ज्यात इतर निर्बंधांसह कोणत्याही ठिकाणी हुक्का बार उघडण्यास मनाई करण्याचा प्रस्ताव होता. दुसऱ्या दिवशी हे विधेयक मंजूर करण्यात आले आणि उजढझ- कायद्यात दुरुस्ती करून राज्यात हुक्का बार उघडणाऱ्याला १ ते ३ वर्षांचा तुरुंगवास आणि १ लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा देण्याची तरतूद करण्यात आली. अधिसूचना जारी झाल्यानंतर काही दिवसांत अनेक रेस्टॉरंट मालकांनी या अधिसूचनेला आव्हान देण्यासाठी कर्नाटक उच्च न्यायालयात धाव घेतली.

न्यायमूर्ती एम नागप्रसन्ना यांच्या एकल न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर १३ फेब्रुवारीपासून या प्रकरणाची सुनावणी सुरू झाली. ११ मार्च रोजी निकाल राखून ठेवण्यात आला.

कर्नाटक सरकारने आपल्या आदेशात म्हटले आहे की, हुक्का पार्लर किंवा बारला आग लागू शकते. त्यामुळे राज्य आग नियंत्रण आणि अग्निसुरक्षा कायद्यांचे उल्लंघन करता येणार नाही. हुक्क्यामुळे हॉटेल, बार आणि रेस्टॉरंट असुरक्षित ठिकाणे बनली आहेत. याचा सार्वजनिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. हुक्का उत्पादनांची विक्री, वापर आणि जाहिरातीला हुक्का तंबाखू किंवा निकोटिन असे म्हणतात. बऱ्याचदा लोक तो खरेदी करतात, तर काही जण त्याचा व्यापार करतात. त्यामुळेच राज्यातील सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी त्यावर तात्काळ बंदी घालण्यात आली आहे.

या प्रकरणातील प्रमुख याचिकाकर्ते आर भरत यांनी युक्तिवाद केला की, अधिसूचना म्हणजे बेकायदेशीर हस्तक्षेप आहे, कारण उजढझ- मध्ये केवळ सार्वजनिक धूम्रपान, तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिराती आणि अल्पवयीन व्यक्तींना मादक पदार्थ विक्री करण्यावरच प्रतिबंध आहेत. उजढझ- च्या कलम ४ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे हुक्का हा धूम्रपान किंवा तंबाखूजन्य पदार्थांमध्ये येत नाही. त्यामुळे उजढझ- द्वारे त्यावर बंदी लागू होणार नाही.याचि केत असा दावाही करण्यात आला आहे की, कर्नाटक आरोग्य विभागाकडे अधिसूचना जारी करण्याचा उजढझ- अंतर्गत कायदेशीर अधिकार नव्हता. तर भरत यांनी कायदेशीररीत्या आपला व्यवसाय चालवण्यासाठी आवश्यक व्यापार परवाने आणि प्रमाणपत्रे मिळविली होती. अधिसूचना घटनेच्या कलम १९(१)(जी) अंतर्गत व्यवसाय मालकांच्या अधिकारांचे उल्लंघन करते, जी नागरिकांना कोणताही व्यापार करण्याचा किंवा व्यवसाय चालवण्याचा अधिकार देते, असंही भरत दावा करतात. या कारणास्तव याचिकाकर्त्यांनी कर्नाटक उच्च न्यायालयाकडे सरकारने दिलेली अधिसूचना रद्द करण्याची आणि याचिकाकर्त्यांच्या कामकाजात हस्तक्षेप न करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली आहे.राज्य सरकारने असा दावा केला की, त्यांना ही अधिसूचना जारी करण्याचा अधिकार आहे, कारण रुग्णालये आणि दवाखाने सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छतेच्या अधिपत्याखाली येते असून, एंट्री ६ अंतर्गत राज्यघटनेच्या सातव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट आहेत.

# २०२३ च्या विश्वचषकापूर्वी खेळपट्टीशी छेडछाड?

## रोहित शर्मा, द्रविडचे नाव घेत कैफचा मोठा दावा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

वनडे वर्ल्डकपच्या अंतिम सामन्यादरम्यान अहमदाबादमध्ये समालोचनाची जबाबदारी मोहम्मद कैफ यांच्यावर होती. तेव्हा कैफने पाहिले की रोहित आणि द्रविड यांनी अंतिम सामन्यापूर्वी सलग तीन दिवस संध्याकाळी पिचची नियमित तपासणी केली.

वनडे विश्वचषक २०२३ होऊन बराच काळ लोटला असला तरी अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून भारताचा झालेला पराभव सर्वांच्या मनात कायम आहे. याच मुद्द्यावर माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफ यांनी एक मोठे वक्तव्य केले आहे. भारताचा कर्णधार रोहित शर्मा आणि मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड फायनलमध्ये त्यांची रणनिती यशस्वीपणे पार पाडण्यात अपयशी ठरले, असे कैफ म्हणाले.

दशकभरानंतर घरच्या



मैदानावर विजेतेपद पटकावण्याचा मुख्य दावेदार असलेला भारत मोहिमेच्या साखळी टप्प्यात अपराजित राहिला. सलग दहा विजयांच्या जोरावर त्यांनी अंतिम लढतीत प्रवेश केला. मात्र, फायनलमध्ये ऑस्ट्रेलियन संघासमोर यजमानांचा दारूण पराभव झाला.

अंतिम सामन्यादरम्यान समालोचन करणाऱ्या कैफने सांगितले की,रोहित आणि द्रविड यांनी अंतिम सामन्यापूर्वी सलग तीन दिवस संध्याकाळी खेळपट्टीची नियमित तपासणी केली. लल्लनटॉपला दिलेल्या मुलाखतीत बोलताना, कैफ म्हणाले की त्यांनी खेळपट्टीचा रंग हळूहळू बदलत असल्याचे पाहिले आणि भारतीय संघ व्यवस्थापनावर याबाबत टीका केली.

रोहित शर्मा आणि राहुल द्रविड संध्याकाळी खेळपट्टीची पाहणी करण्यासाठी यायचे आणि सामन्याच्या आधी सलग तीन दिवस रोज येत असतं. त्यादरम्यान मी खेळपट्टीचा रंग बदलताना पाहिलं.

ऑस्ट्रेलियाच्या संघात कमिन्स आहे, स्टार्क आहे, त्यांच्याकडे वेगवान गोलंदाजी करणारे गोलंदाज आहेत, त्यामुळे त्यांना स्लो पिच देऊया आणि तिथेच मोठी चूक झाली. असे कैफ यांनी सांगितले.

आयसीसी एकदिवसीय विश्वचषक २०२३ च्या अंतिम सामन्यात, ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो संघासाठी अगदी योग्य ठरा. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडिया ५० षटकात २४० धावा करत सर्वबाद झाली. भारतीय संघाची मधली फळी धावा काढण्यासाठी खूप संघर्ष करताना दिसली. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने ४३ षटकांतच ६ गडी गमावून २४१ धावांचे लक्ष्य पार केले. कांगारूंचा सलामीवीर ट्रॅव्हिस हेडने १३७ धावांची मॅचविनिंग इनिंग खेळली आणि भारताकडून जेतेपद हिसकावले.

# ताडोबा जंगल सफारी तिकीट घोटाळ्यातील आरोपी पोलिसांना सापडत कसे नाही?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नागपूर : सर्वोच्च न्यायालयानेही ताडोबा जंगल सफारी बुकिंगमध्ये १२ कोटींचा गैरव्यवहार करणाऱ्या ठाकूर बंधूंचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला. त्याला एक महिना झाला पण चंद्रपूर पोलिसांना आरोपींनी जेरबंद करण्यात अपयश आले आहे. पोलिसांचा हा वेळकाढूपणा कशासाठी आणि कोणाच्या इशाऱ्यावर सुरू आहे, असा संतप्त सवाल उपस्थिती केला जात आहे.अभिषेक आणि रोहितकुमार विनोद सिंग ठाकूर अशी आरोपींची नावे आहेत. ताडोबा जंगल सफारी बुक करणारी कंपनी वाइल्ड कनेक्टिव्हिटी सोल्युशन्सचे ते भागीदार आहे.

ताडोबा-अंधारी टायगर कॉन्झर्व्हेशन फाउंडेशनने जंगल सफारींच्या ऑनलाइन बुकिंगसाठी १० डिसेंबर २०२१ रोजी वाइल्ड कनेक्टिव्हिटी सोल्युशन्ससोबत करार केला. परंतु सोल्युशन्सने करारातील अटींचा भंग करून जंगल सफारी बुकिंगसाठी १२ कोटी १५ लाख




५० हजार ८३१ रुपये वनविभागाकडे भरले नाहीत. बुकिंगबाबत आवश्यक पुरावेही सादर करण्यात आले नाहीत. या प्रकरणी चंद्रपूर येथे गुन्हा दाखल झाल्यानंतर ठाकूर बंधूंनी अटकपूर्व जामिनासाठी उच्च न्यायालयात अर्ज केला होता.

बुकिंग डेटा प्रदान केलेला नाही. पुरावे नष्ट करण्यासाठी डेटा नष्ट करण्यात आला. आरोपींनी विविध बँकांमध्ये २७ खाती उघडून त्यामध्ये पैसे ट्रान्स्फर केले. सरकारला जीएसटी भरला नाही. याशिवाय ३३४ जिप्सी मालक आणि ३३४ गाईडचे शुल्कही भरलेले नाही. उच्च न्यायालयाने या आधारावर ठाकूर बंधूंचा जामीन अर्ज फेटाळला होता. यानंतर ठाकूर बंधूंनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. पण सर्वोच्च न्यायालयानेही ठाकूर बंधूंना दिलासा देण्यास नकार देत अटकपूर्व जामीन अर्ज १३ फेब्रुवारी २०२४ रोजी फेटाळला. तरी चंद्रपूर पोलीस हातावर हात देऊन बसले आहेत. त्यामुळे पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात असून या गैरव्यवहारात आरोपींना वाचवण्याचा आरोप होत आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या ऑनलाइन बुकिंगचे कंत्राट हे त्रयस्थ कंपनीला देण्यात आले. याच घोटाळा प्रकरणातील आरोपी अभिषेक ठाकूर आणि रोहित ठाकूर यांच्या चंद्रपूर वाईल्ड कनेक्टिव्हिटी सोल्युशन या कंपनीला हे कंत्राट देण्यात आले. या कंपनीसोबत ताडोबा-अंधारी टायगर प्रोजेक्ट प्रमोशन फाऊंडेशनचे कार्यकारी संचालक यांनी करार केला. या करारानुसार, ही कंपनी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात कमिशनच्या आधारावर ऑनलाइन सफारी बुकिंग करू शकते. २०२० ते २०२३ या कालावधीत या कंपनीला केलेल्या बुकिंग अंतर्गत २२ कोटी २० लाख एवढी रक्कम ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रमोशन फाउंडेशनकडे जमा करायची होती. मात्र या कंपनीनं केवळ १० कोटी ६५ लाख जमा करण्यात आली. कंपनीने ताडोबा व्यवस्थापनाला १२ कोटी १५ लाख ५० हजारांनी चुना लावला. चार वर्षांच्या लेखापरीक्षणानंतर ही बाब समोर आल्यानं, या ठाकूर बंधूवर पोलिसात गुन्हा नोंदविला. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा करत आहे.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायक्षेत्र)


# आगामी विधानसभा निवडणूक लढवणार : अॅड. वैभव पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

विटा : आपल्या मतदार संघाचे आमदार अनिल बाबर यांचे मध्यंतरी निधन झाले. त्यांच्या निधनाने आपण सर्व जण दु : ख झालो. परिणामी, राजकारणात थोडसं सक्रिय नव्हतो. त्यांच्या बरोबर असणारे वैचारिक मतभेद संपले आहेत. आता पुन्हा नव्या जोमाने सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करीत आहोत. पोटनिवडणूक किंवा ऑक्टोबर मध्ये होणाऱ्या विधानसभा लढवणार आहे. आमचे नेते अजितदादा पवार यांच्या समवेत चर्चा करणार आहेत. त्यांना खानापूर मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे लढणे आवश्यक आहे. हे पटवून दिले जाईल. खानापूर मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. विटा शहरात मोठ्या प्रमाणात विकासकामे सुरू आहेत. अशी माहिती माजी नगराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष अॅड वैभव पाटील यांनी दिली.

येथील विटा अर्बन सोसायटीच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी किरण तारळेकर , अविनाश चोथे, भगवान पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी अॅड. पाटील यांनी आगामी निवडणूक लढविण्याची संकेत दिले.

अॅड. पाटील म्हणाले, गेल्या चार महिन्यांत आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा यांच्या समवेत काम करण्याचा निर्णय घेतला. त्यांना जिल्हाध्यक्षपद दिले. आज जिल्ह्यात कवठेमहांकाळ वगळता सर्वत्र पदाधिकाऱ्यांच्या निवडी केल्या आहेत. अल्पावधीत जोमाने काम करीत आहे.



मध्यंतरी विटा शहराला स्वच्छ सर्व्हेक्षण देशांत स्पर्धेत सातवा क्रमांक आला. त्यातील अटी पाहता थोडी अडचण होती. स्पर्धेतंर्गत विटा शहराच्या विकासासाठी १५ कोटी मिळाले आहेत. मध्यंतरी शहारातील नागरीकांना पुरेसे व मुबलक पाणी पुरवठा व्हावा, सुधारित पाणी पुरवठा योजना मंजूर झाली आहे. त्यासाठी ८७ कोटी रूपये निधी मंजूर झाला आहे. भुयारी गटार योजना मंजूरीच्या अंतिम टप्प्यात आहे. गटारी योजना मंजूर होण्यासाठी माणसी १३५ लिटर पाणी मिळण्याची अट आहे. सुधारीत पाणी योजना झाल्यानंतर भुयारी गटार प्रश्न मार्गी लागेल. नगरविकास खात्याचे सचिव डॉ. गोविंदराज यांच्या पुढे योजनेचे सादरीकरण केले जाईल. आम्हाला खात्री योजना मंजूरी मिळाले.

ते पुढे म्हणाले, खासदार संजय पाटील यांच्या विशेष निधी १ कोटी ५ लाख रुपयांचा निधी मिळाले आहे, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विविध विकास कामे मंजूर झाली आहे. तालुक्याच्या व शहराच्या विकासासाठी १ कोटी ९३ लाख मंजूर झाले आहेत. या मध्ये जुना वासुंबे रस्ता ते सुळकाई मंदीर पर्यंत रस्ता होणार आहे,त्यासाठी ९२ लाख रुपये मंजूर झाले आहेत. यामुळे साळशिंगे , लेंगरे रस्त्यावरुन होणारी वाहतूकीला पर्याय मार्ग उपलब्ध होईल. आदर्श महाविद्यालय ते भवानीमंदीर पर्यंत रस्ता होईल, त्यासाठी ९० लाख रुपये मंजूर झाले आहेत. मायणी रस्ता होणाऱ्या वाहतुकीसाठी पर्याय मार्ग उपलब्ध होईल. परिणामी, शहराच्या वाहतूक पडणार बोजा कमी होईल. लोक शाहीर आण्णा भाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत २ कोटी १२ लाख मंजूर झाले आहेत, विटा शहर हे जिल्ह्यात वेगाने वाढणारे शहर म्हणून परिचित आहे. शहराच्या विकासासाठी सगळ्या सहकार्य केले जाईल,

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सह जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, प्रशासक , मुख्याधिकारी , कर्मचारी यांचे सहकार्य लाभले आहे. यावेळी माधव रोकडे , प्रशांत कांबळे , भरत कांबळे , विकास जाधव , पांडुरंग पवार उपस्थित होते.



# संख येथे विविध विकास कामाचे उद्घाटन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

संख : जत तालुका संख येथील श्री लायव्वा देवी मंदिराचे पत्रा शेड तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम (डीपी डीसी क गट ) मधून व ग्रामपंचायत निधीतून बिरादार वस्ती शाळा समोरील मुर्मिकरण रस्त्याचे नारळ फोडून उद्घाटन उपसरपंच सुभाष पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

जत तालुका पूर्व भागातील संख येथील विविध विकास कामाचे उदघाटन करण्यात आले. या मध्ये तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रम (डीपी डीसी क गट ) अंतर्गत मधून श्री लायव्वा देवी मंदिरचे पत्रा शेड करण्यासाठी ४ लाख रुपये चे मंजूरी झाली आहे. ३० बाय ४५ इतकी शेड कामं होणार आहे. तसेच संख पासून २ किलोमीटर अंतरावर असलेले जि. प. कन्नड शाळा( बिरादार वस्ती) येथील ग्रामपंचायत मधून ३ लाख रुपयांचे मंजुरी झाली असून पाणंद रस्त्याचे मुर्मीकरणाचे काम करण्यात येणार आहे.त्या कामांचे ही उद्घाटन करण्यात आले.

यावेळी संखचे युवा नेते उपसरपंच सुभाष पाटील, दयगोंडा बिरादार,मलिकार्जून सायंगाव,पोलीस पाटील सुरेश पाटील,सोसायटी चेअरमन मैनूद्दीन जमादार, राजेंद्र हलकुडे, आय. एम. बिरादार ,राजेंद्र कन्नूरे, रमेश कनमडी,ग्रामपंचायत सदस्य सागर पाटील,बसगोंडा बिरादार, धानप्पा बिरादार, सदाशिव पूजारी,महादेव पूजारी, आमगोंड पूजारी, कॉन्टॅक्टदार महेश करे, पिंटू बिराजदार व सर्व ग्रामपंचायत सदस्य,सोसायटी सर्व सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# 'गोकुळ' कडून दूध संस्थांना हिरक महोत्सवी भेट व्यवस्थापन खर्चापोटी १० पैसे वाढ

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघातर्फे (गोकुळ) जिल्ह्यातील प्राथमिक दूध संस्थांच्या व्यवस्थापन खर्चामध्ये प्रतिलिटर १० पैसे व संस्था सचिवांना ५ पैसे वाढीचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. येत्या १ एप्रिलपासून त्याची अंमलबजावणी होईल.' अशी घोषणा चेअरमन अरुण डोंगळे यांनी केली. तसेच दूध उत्पादक शेतकरी, दूध संस्था, व कर्मचारी यांचे सहकार्य मोलाचे असून त्यांच्या सहकार्यामुळेच गोकुळ २० लाख लिटरचे उध्दिष्ठ साध्य करेल तसेच असा विश्वास संघाचे चेअरमन अरुण डोंगळे यांनी गोकुळच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमीत्य अमृतसिद्धी हॉल, कळंबा येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रम मध्ये व्यक्त केला.

पुढे बोलताना संघाचे चेअरमन अरुण डोंगळे म्हणाले कि, दूध संघाची स्थापना १६ मार्च १९६३ इ. रोजी ७०० लिटर दूध संकलनावर झाली. आज ७०० लिटर वरुन सध्या प्रतिदिनी सरासरी १७ लाख लिटर दूध संकलन होत आहे. १९८५ साली दूध महापूर (ऑपरेशन फ्लड-आणंद) योजना चालू झाली, सर्वांच्या सहकार्यातून संघाला भरभराटीचे दिवस आलेत.आम्ही केलेल्या आवाहनास सभासदांनी साथ दिल्यामुळे म्हैस दूधाची वाढ चांगल्याप्रकारे झाली आहे. गोकुळ म्हणजेच गुणवत्ता हे समीकरणच बनले आहे.

गुणवत्तेच्या जोरावरती गोकुळ राज्यामध्ये प्रथम आहे. महाराष्ट्रात गाय दूध खरेदी दरामध्ये गोकुळ आघाडीवर असून शासनापेक्षा प्रतिलिटर ८ रुपये जास्त दर देत आहे. गोकुळने दूध उत्पादकास सर्वसाधारण ८२ टक्के रक्कमेचा परतावा दिला असून, दूध बिला पोटी दर १० दिवसाला सरासरी ७० कोटी रुपये आदा केले जातात. महाराष्ट्रात सर्वाधिक म्हैस / गाय दूध दर, गाय दूध दर शासन दरापेक्षा ८ रुपये जास्त देत आहोत, म्हैस दूध खरेदीसाठी रुपये ५५.०६ /- व गाय दुधासाठी सरासरी ३७.२६ /- इतका उच्चांकी दर दिला आहे.

राज्यात सर्वाधिक गाय दूध अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा (रुपये २.५ कोटी), गाय दूध अनुदानासाठी सर्वात जलद गतीने काम करणारा गोकुळ दूध संघ आहे. हिरक महोत्सवी वर्षानिमित्य दूध संस्थांच्या बळकटी करणासाठी १ एप्रिल २०२४ पासून दूध संस्थांना व्यवस्थापन खर्चात प्रतिलिटर १० पैसे व दूध संस्था कर्मचारी यांना प्रोत्साहन पर ५ पैसे वाढ करण्यात येणार आहे. तसेच गोकुळ केसरी' कुस्ती स्पर्धा भरवणार असल्याचे मनोगत व्यक्त केले.

यावेळी सन २०२१-२२ ते २०२२-२३ मध्ये जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरीय गाय/म्हैस जास्तीत जास्त दूध पुरवठा, म्हैस जास्तीत जास्त दूध पुरवठा, म्हैस उत्तम प्रत दूध पुरवठा, गाय/ म्हैस जास्तीत जास्त दूध पुरवठा(महिला संस्था) दूध संस्थांना, तसेच कोल्हापूर, पुणे व मुंबई येथील जास्तीत-जास्त दूध विक्री करणा-या दूध वितरकांचाही सत्कार व बक्षीस वाटप गोकुळचे चेअरमन अरुण डोंगळे व जेष्ठ संचालक विश्वास पाटील यांच्या हस्ते व सर्व संचालकांच्या उपस्थित करण्यात आले.

# महिलेला पाच लाखांचा गंडा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : जिममध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून महिलेची ५ लाखांची फसवणूक केली. याप्रकरणी प्रेरणा शिवाजी ढाकणे (२९, रा. शिंदे डेअरी जवळ, खराडी) यांनी चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून झेउर रेहमान आणि इतरांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ४ मार्च २०२० ते ५ ऑक्टोबर २०२२ दरम्यान घडली आहे.

अधिक माहितीनुसार, आरोपी झेउर रेहमान हे फिक्शन फिटनेस जिमचे मालक आहेत. फिर्यादी प्रेरणा ढाकणे आणि झेउर रेहमान यांची ओळख झाली होती. झेउर रेहमान याने फिर्यादी महिलेला चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून ५ लाख रुपये जिममध्ये गुंतवणूक करायला सांगितले. फिर्यादी यांनी झेउर रेहमान यांच्या पत्नीच्या बँक खात्यावर ५ लाख रुपये पाठवले. आरोपीने हे पैसे जिममध्ये गुंतवणूक करून परतावा न देता फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक रेवले करत आहेत.

# साखराळे येथे विविध विकास कामांचा शुभारंभ



**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

इस्लामपूरः येथील भैरवनाथ मंदीर संरक्षक भिंत व मुस्लिम समाज दफनभूमीत जोड रस्त्याच्या कामाचा युवा नेते,राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्ष प्रतिकदादा पाटील यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजयराव पाटील,जेष्ठ नेते बाळासाहेब पाटील,माजी सभापती आनंदराव पाटील, सरपंच सुजाता डांगे,उपसरपंच बाबुराव पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.

माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून साखराळेचे ग्रामदैवत भैरवनाथ मंदीरास तिर्थस्थान क मधून १० लाख रुपयांची संरक्षक भिंत आणि मुस्लिम समाज दफनभूमीत जिल्हा खनिज प्रतिष्ठानमधून रुपये ८ लाखाचा जोड रस्ता मंजूर झाला आहे. या दोन्ही विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी अविनाश पाटील, राजेंद्र पाटील, शिवाजी डांगे, पी. बी. सुर्वे,शैलेश सुर्यवंशी, विनोद बाबर, सचिन पाटील,रामराजे पाटील, मधुकर जाधव,प्रशांत पाटील,सुशील पाटील, तजमुल चौगुले, वजीर चौगुले,डॉ.इकबाल मुल्ला,अमीर मुजावर,हारुण संदे,शहाबुद्दीन सैदेखान यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्व.आर.आर (आबा) पाटील 'स्वच्छ व सुंदर गाव' लंगरपेठ सांगली जिल्ह्यात प्रथम

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : लंगरपेठ (तालुका कवठेमहांकाळ) येथील ग्रामीण जनतेचे आरोग्यदायी जीवन स्तर,आणि पर्यायी जीवनस्तर प्रगल्भतेकडे नेणे व खऱ्या अर्थाने लंगरपेठच्या जनतेला पारदर्शकपणे तसेच शालेय विद्यार्थ्यांना 'स्वच्छतेकडून समृद्धीकडे' नेता येण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र शासनाने गावोगावी स्वर्गीय आर.आर. आबा पाटील 'स्वच्छ व सुंदर गाव स्पर्धा' अभियानांतर्गत कवठेमहांकाळ तालुक्यात प्रथम आलेल्या आणि विशेष बाब म्हणून जिल्हास्तरीय 'स्वच्छ व सुंदर गाव' स्पर्धेसाठी प्रथम क्रमांक मिळवून देण्यात आलेला आहे. याबाबत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी संपूर्ण तपशीलाने पाहणी करण्यात आलेली होती.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम.तृप्ती धोडमिसे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे,मुख्य लेखा वित्त अधिकारी विठ्ठल चव्हाण, कृषी विस्तार अधिकारी श्रीधर कुलकर्णी, कवठेमहांकाळ तालुका गट विकास अधिकारी उदयकुमार कुसुरकर,गट शिक्षणाधिकारी प्रमोद गोफणे, विस्ताराधिकारी ज्ञानेश्वर गुरव यांनी पाहणी केली.जिल्हा मार्केट कमिटी सभापती महेश पवार, सरपंच अंजना कांबळे, उपसरपंच दत्तात्रय सूर्यवंशी, ग्रामपंचायत कार्यकारणीच्या मार्गदर्शनाखाली गावातील ग्रामस्थांनी तसेच राज्य मॉडेल स्कूल लंगरपेठच्या शिक्षक वृंदांनी प्रयत्नपूर्वक सहभाग घेऊन जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे.




चिल्ड्रन पार्क, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आयुर्वेदिक गार्डन, पाराचे सुशोभीकरण, सेल्फी पॉईंट, सांडपाण्याचे नियोजन,घर व गावापर्यंतची स्वच्छता, आदर्श गार्डन, घंटागाडी, माजी वसुंधरा अशी विविध विकास कामे करून लंगरपेठचे रूप पालटले आहे.शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष डॉ.रवींद्र सूर्यवंशी, वरिष्ठ मुख्याध्यापक श्री.उन्मेष शेटे,श्री.अनिल हंकारे गुरुजी, श्री.शिवाजी कदम, श्री.विद्या कदम, श्री.माधुरी सूर्यवंशी,श्री. सतीश गिरीबुवा,श्री.सादू पांढरे, श्री.रमेश झिटे या शिक्षक वृंदाने राज्य मॉडेल स्कूलची तयारी आदर्शवत केली आहे.तसेच आदर्श गुणवत्ता,शालेय विविध स्पर्धा,माझी वसुंधरा अंतर्गत स्पर्धा ही या शाळेत राबवलेल्या आहेत.लंगरपेठ राज्य मॉडेल स्कूल अंतर्गत शाळेपुढे लॉन्स,विविध प्रकारचे वृक्ष,आयुर्वेदिक गार्डन, पाण्याची विशेष सोय, मुलांना खेळण्यासाठी चिल्ड्रन पार्क,प्लॅस्टिक कचरा संकलन,कचरापेटी, अद्यावत शौचालय, प्रधानमंत्री पोषण आहार अंतर्गत शिल्लक अन्नाचे नियोजन,परसबाग, सुशोभित बाग, बाला पेंटिंग अंतर्गत शालेय सुशोभीकरण व रंगरंगोटी,शाळेबाहेरची झाडे आदीची पूर्तता डॉ.सुर्यवंशी यांनी स्कूल कमिटी व शिक्षक वृंदा च्या सहकार्याने पूर्ण केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीम.तृप्ती धोडमिसे व इतर सदस्यांनी याबाबत समाधान व्यक्त केले.

महेश पवार यांनी लंगरपेठ गाव जिल्ह्यातील आदर्श गाव ठरेल या दृष्टीने सर्व लोकांनी प्रयत्न केल्याचे सांगितले. समितीचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी व समिती सदस्य यांनी शाळेची तसेच गावची संपूर्ण पाहणी केली; तसेच दप्तर तपासणी करून केलेल्या विकासाची पाहणी केली. गावातून लोक सहभागातून, श्रमदानातून, शासनाच्या विविध योजनातून झालेल्या कामाबद्दल समितीच्या अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले व अभिनंदननीय कौतुक केले.

# चाइल्ड पोर्नोग्राफी पाहणे गुन्हा आहे का? सर्वोच्च न्यायालयाची भूमिका काय?


**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

भारतात अनेक पॉर्न साइट्सवर बंदी आहे. २०१५ साली भारत सरकारने या साइट्सवर बंदी घातली होती. या साइट्स बंद झाल्या असल्या तरीही पॉर्न पाहणार्यांची संख्या घटलेली नाही. पोर्नोग्राफी पाहणे हा गुन्हा आहे की नाही? या विषयावर अनेकदा चर्चा झाली आहे. मात्र आता पुन्हा हा विषय चर्चेत येण्याचे कारण म्हणजे, मद्रास उच्च न्यायालयाला या विषयावरून सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आणि चाइल्ड पॉर्नोग्राफी एक सीरियस विषय असल्याचे सांगितले. नेमके हे प्रकरण काय? सर्वोच्च न्यायालयाची भूमिका काय? चाइल्ड पोर्नोग्राफी पाहणे खरंच गुन्हा आहे का? कायदा काय सांगतो? याबद्दल सविस्तर जाणून घेऊ या.

सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी (११ मार्च) ला चाइल्ड पोर्नोग्राफीबाबत मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला आहे. काही दिवसांपूर्वी मद्रास उच्च न्यायालयाने पॉक्सो संबंधित एका प्रकरणात निर्णय दिला होता की, एकांतात चाइल्ड पोर्नोग्राफी पाहणे किंवा डाउनलोड करणे हा पॉक्सो कायदा, २०१२ आणि माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० नुसार गुन्हा नाही. मुख्य न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी.परडीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

याचिका काय आहे?

फरीदाबादच्या 'जस्ट राईट्स फॉर चिल्ड्रन अलायन्स' आणि नवी दिल्लीस्थित 'बचपन बचाओ आंदोलन' या दोन बालकल्याण स्वयंसेवी संस्थांनी सर्वोच्च न्यायालयात ही याचिकादाखल केली होती. या याचिकेत म्हटले की, चाइल्ड पोर्नोग्राफी पाहणे पॉक्सो कायद्याच्या कक्षेत येत नाही असा निर्णय न्यायालयाने दिला आहे. मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा घातक परिणाम बाल कल्याणावर होऊ शकतो. याचिकाकर्ता स्वयंसेवी संस्थेचे ज्येष्ठ वकील एच.एस. फुलका यांनी असा युक्तिवाद केला



की, हा आदेश या संदर्भात असणार्या कायद्याच्याही विरुद्ध आहे. युक्तिवादाची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाला फटकारत नोटीस बजावली आणि प्रकरणाची पुढील सुनावणी ५ एप्रिलला ठेवली.

मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशात काय?

अंबत्तूर पोलिसांनी २८ वर्षीय तरुणाविरुद्ध इंटरनेटवरून चाइल्ड पोर्नोग्राफी व्हिडिओ डाउनलोड केल्याबद्दल पॉक्सो आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. मात्र या तरुणाविरुद्धची कारवाई मद्रास उच्च न्यायालयाने रद्द केली. कारण- त्याने चाइल्ड पोर्नोग्राफी एकांतात पाहिलं होतं. त्याने स्वत: तो कंटेट तयार केला नव्हता, प्रसारित केला नव्हता आणि फॉरवर्ड-शेअरही केला नव्हता. न्यायमूर्ती आनंद व्यंकटेश यांच्या खंडपीठाने निर्णय दिला की, या न्यायालयासमोर सादर केलेली सामग्री पॉक्सो कायदा, २०१२ आणि माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० नुसार तरुणाला गुन्हेगार ठरवत नाही. न्यायमूर्ती व्यंकटेश यांनी असेही सांगितले की, एखाद्या व्यक्तीने एकांतात मोबाइल किंवा लॅपटॉपवर केवळ चाइल्ड पोर्नोग्राफी डाउनलोड केली आणि पाहिली अशा प्रकरणांचा माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७-बी मध्ये समावेश नाही.

माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७-बीनुसार, इलेक्ट्रॉनिक स्वरुपात लैंगिक कृत्यांमध्ये लहान मुले असलेली चित्रफीत प्रकाशित करणे किंवा तयार करणे गुन्हा आहे. यात दोषी आढळल्यास पाच ते सात वर्षांचा तुरुंगवास आणि १० लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. पोक्सो कायद्याच्या कलम १४ मध्ये, पोर्नोग्राफिक हेतूंसाठी लहान मुलांचा वापर केल्यास शिक्षेची तरतूद आहे. कलम १४(१) नुसार, पोर्नोग्राफिक हेतूंसाठी लहान मुलांचा वापर केल्यास पाच वर्षांपेक्षा जास्त तुरुंगवासाची शिक्षा आणि दंड होऊ शकतो. याच गुन्ह्यात दुसऱ्यांदा दोषी आढळल्यास सात वर्षांपेक्षा जास्त तुरुंगवासाची शिक्षा आणि दंड होऊ शकतो.

'जनरेशन झेड' मुले पॉर्न व्यसनाच्या आहारी जात आहेत. समाजाने त्यांना दंडित करण्याऐवजी त्यांना योग्यरित्या शिक्षित केले पाहिजे, असे मद्रास उच्च न्यायालयाने सांगितले. न्यायालयाने दोषीला व्यसनाच्या आहारी असल्याचे आणि समुपदेशनाची गरज असल्याचे सांगत, त्याच्यावरील कारवाई रद्द केली. मद्रास उच्च न्यायालयाने केरळ उच्च न्यायालयाच्या निर्णयाचाही उल्लेख केला; ज्यानुसार एकांतात पोर्नोग्राफी पाहणे हा भारतीय दंड संहिता (आयपीसी) च्या कलम २९२ अंतर्गत गुन्हा नाही.

कायदा काय सांगतो?

केरळ उच्च न्यायालयाने पॉर्न पाहणे हा गुन्हा नाही असे म्हटले असले, तरी चाइल्ड पोर्नोग्राफी पाहणे हा गुन्हा आहे. कारण- माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७-बी मध्ये चाइल्ड पोर्नोग्राफी पाहण्यासह त्याच्याशी संबंधित सर्व प्रकारचे कृत्य गुन्हा आहेत.

इलेक्ट्रॉनिक स्वरूपात लहान मुले असलेले अश्लील साहित्य प्रसारित करणे, अशी सामग्री गोळा करणे, शोधणे, ब्राउझ करणे, डाउनलोड करणे, त्याची जाहिरात करणे, देवाणघेवाण करणे किंवा वितरीत करणे गुन्हा आहे. यासह प्रौढ व्यक्तींनी मुलांशी ऑनलाइन संबंध जोपासतात, त्यांना लैंगिक कृतीसाठी प्रवृत्त करणे, ऑनलाइन मुलांचे लैंगिक शोषण करणे, त्याची चित्रफीत तयार करणे यांसारखे सर्व कृत्य गुन्हा आहेत.

जून २०२१ मधील पीजी सॅम इन्फंट जोन्स विरुद्ध राज्य मद्रास उच्च न्यायालय प्रकरणात, दोषीने त्याच्या ईमेल आणि फेसबुक खात्याद्वारे चाइल्ड पोर्नोग्राफी ब्राउझ केले, डाउनलोड केले आणि प्रसारित केले. या प्रकरणाच्या निर्णयात न्यायमूर्ती जी.आर. स्वामीनाथन यांनी नमूद केले की, कायद्यात अशी कोणतीही तरतूद नाही जी एकांतात पोर्नोग्राफी पाहण्यास मनाई करते. परंतु, पोर्नोग्राफी आणि चाइल्ड पोर्नोग्राफी यात फरक आहे. ते म्हणाले की, माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७-बीमध्ये चाइल्ड पोर्नोग्राफीशी संबंधित प्रत्येक प्रकारची कृती गुन्हा आहे. त्यामुळे चाइल्ड पोर्नोग्राफी पाहणेदेखील एक गुन्हा असल्याचे सांगत, त्यांनी आरोपीला दोषी ठरवले.

'त्यामुळे केवळ भारतातच नव्हे, तर जगभरात चाइल्ड पोर्नोग्राफी गुन्हा आहे. चाइल्ड पोर्नोग्राफीसाठी कठोर शिक्षेची तरतूद करते. याशिवाय गुन्ह्यांची ओळख पटवण्यासाठी आणि असे गुन्हे रोखण्यासाठी अनेक स्वयंसेवी संस्था पुढाकार घेतात.

